बहुप्रतिक्षेत असलेली कृषी समृद्धी योजना २०२५-२६ राबवण्यास मान्यता : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे >> पान 2

सिंधुदुर्गमध्ये महायुती नाही; दीपक केसरकर यांची माहिती >> पान 3

लोणार सरोवरात मासे निसर्गात बदल की संकटाची चाहूल? >> पान 4

**सुविचार**

दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद शोधा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 95 ■ शनिवार, दि. 08 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




उदयपूरमध्ये होणार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडाचे लग्न! आतील पान

# पुण्यातील जमीन खरेदीची चौकशी होणारच

## शासन आदेश जारी

**मुंबई/प्रतिनिधी : पुण्यातील मुंढवा परिसरातील सर्वे नंबर ८८ मधील दस्ताची अवैधरित्या नोंदणी झाली आहे आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर महसूलाची हानी झाली असल्याचे विविध माध्यमांतून वृत्त प्रसारित झाले आहे. प्रस्तुत बातमीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी सविस्तर चौकशी होणे आवश्यक असल्याने, चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करण्याचा शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार, महसूल, मुद्रांक व नोंदणी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. शासनाने यासंदर्भात शासन आदेश जारी केला असून पुढील महिनाभरात समितीकडून अहवाल सादर करण्यात येईल.**



पार्थ पवार यांच्या कंपनीने खरेदी केलेल्या जमीन व्यवहार प्रकरणी सविस्तर चौकशीच्या अनुषंगाने, अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे चौकशी समिती नियुक्त करण्यात येत आहे, असे शासन आदेशात म्हटले आहे. तसेच, अध्यक्षांसह ६ जणांचा या समितीत समावेश असणार असून त्यामध्ये विभागीय आयुक्त आणि पुण्याचे जिल्हाधिकारी देखील चौकशी करणार आहेत. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडून सदरील जमिनीचा व्यवहार रद्द करण्यात येणार असून ती जमीन शासनाला परत दिली जाईल, अशी सूत्रांची माहिती आहे. मात्र, चौकशी समितीकडून संबंधित प्रकरणात ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळाबाजार केला त्यांच्यावर कारवाई होणार आहे.

चौकशी समितीकडून खालील मुद्द्यांवर होणार चौकशी

प्रस्तुत प्रकरणात अनियमितता झाली आहे का, याबाबत चौकशी करणे.

जर अनियमितता झाली असल्याचे आढळले, तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून >> पान २

## अखेर पुण्यातील जमिनीचा व्यवहार रद्द, अजित पवारांनी दिली माहिती

**मुंबई/प्रतिनिधी** : पुण्यातील कोंढवा जमीन अनियमितता प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच, उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडील अजित पवारांनी व्यवहारासंदर्भात माहिती दिली. माझ्या माहितीनुसार हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे. आता, याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून ही समिती संपूर्ण चौकशी करेल, त्या चौकशीत सर्व घटनाक्रम पुढे येईल. कोणी मदत केली, कुणाचे फोन गेले हे सगळं समोर येईल. मात्र, मी नेहमीच माझ्या >> पान २

## पार्थ पवारांचा 'जिजाई' बंगला पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. यावेळी निमित्त आहे ते त्यांच्या 'अमेडिया' कंपनी आणि 'जिजाई' बंगल्याचं. पुण्यातील मुंढवा येथील वादग्रस्त जमीन खरेदी प्रकरणात पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचा नोंदणीकृत पत्ता हा अजित पवारांचे निवासस्थान असलेल्या 'जिजाई' बंगल्याचा देण्यात आल्याने नवा वाद निर्माण झाला आहे.

दरम्यान, आता प्रश्न असा उपस्थित केला जात आहे की, 'पार्थ पवार यांनी अमेडिया कंपनीचे कार्यालय निवासी बंगल्यात सुरू केले असल्यास,त्यांनी महापालिकेला मिळकत कर व्यावसायिक दराने भरला आहे का?' या प्रकरणाची आता चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. हा बंगला मूळ बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसले यांचा असून अजित पवार तिथे भाडेतत्त्वावर राहतात. विशेष म्हणजे, यापूर्वी आदर्श घोटाळ्यातही याच बंगल्याचा पत्ता वापरण्यात आल्याने 'जिजाई' बंगला पुन्हा एकदा वादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटींचे बाजारभाव असणारी जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या खरेदी व्यवहारात शासनाची १५२ कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे खरेदी व्यवहारात केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरण्यात आले आहे. यात सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे. यावरून राजकीय राळ उठली असून, अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधी पक्ष करत आहेत. >> पान २

## दादरच्या 'स्टार मॉल' मध्ये भयंकर आग!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : दादर पश्चिम येथील गजबजलेल्या स्टार मॉलमध्ये आज (७ नोव्हेंबर २०२५) दुपारी मोठी दुर्घटना होता होता टळली. मॉलच्या आत असलेल्या प्रसिद्ध मॅकडोनाल्ड्स रेस्टॉरंटच्या किचनमध्ये अचानक आग लागल्याची माहिती मिळताच एकच धावपळ उडाली. या घटनेची नोंद दुपारी ३ वाजून ३२ मिनिटांनी झाली.

एन. सी. केळकर मार्गावरील, थेट सेनाभवनाच्या समोर असलेल्या या मॉलमधील मॅकडोनाल्ड्सच्या किचनमध्ये आग लागल्याची तात्काळ अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. मुंबई अग्निशमन दलाने त्वरित कारवाई करत घटनास्थळी धाव घेतली.

आगीची बातमी मिळताच अग्निशमन दल, पोलीस, १०८ ॲम्ब्युलन्स आणि स्थानिक वॉर्ड कर्मचारी लगेचच घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी कसलीही दिरंगाई न करता आग विझवण्याच्या कामाला सुरुवात केली.

अवघ्या १६ मिनिटांत, म्हणजेच दुपारी ३ वाजून ४८ मिनिटांनी, अग्निशमन दलाने ही आग 'लेव्हल १' अर्थात किरकोळ स्वरूपाची असल्याचे घोषित करून पूर्णपणे नियंत्रणात आणली.

सुदैवाने, या घटनेत कोणतीही जखमी होण्याची किंवा जीवितहानीची नोंद झालेली नाही. व्यस्त परिसरात आणि एका मोठ्या मॉलमध्ये आग लागल्याने सुरुवातीला भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र अग्निशमन दलाच्या जलद प्रतिसादाने मोठा अनर्थ टळला. या आगीमागील नेमके कारण काय होते, याचा तपास आता सुरू करण्यात आला आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर!

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा नवीन अभ्यासक्रम जाहीर करण्यात आला आहे. यंदा विशेष बाब म्हणून चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी या चारही इयत्तांच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचा अभ्यासक्रम कधी जाहीर होणार, याकडे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. अखेर परिषदेने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला आहे.

चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण चार विषयांचा समावेश असेल, गणित, बुद्धिमत्ता चाचणी, प्रथम भाषा आणि इंग्रजी (तृतीय भाषा). ही परीक्षा मराठी, उर्दू, इंग्रजी, हिंदी, गुजराती, तेलगू आणि कन्नड अशा सात माध्यमांतून घेण्यात येणार आहे.

चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी:

प्रथम भाषेत आकलन, शब्दसंपत्तीवरील प्रभुत्व, कार्यात्मक व्याकरण आणि भाषाविषयक सामान्य ज्ञान विचारले जाणार आहे. गणितामध्ये संख्याज्ञान, संख्यांवरील क्रिया, अपूर्णांक, मापन, आकृतीबंध, भूमिती आणि चित्रालेख या घटकांचा समावेश आहे. इंग्रजी विषयात शब्दसंग्रह, विरामचिन्हे, संख्या माहिती, व्याकरण आणि चिकित्सक विचार यावर भर असेल. तर बुद्धिमत्ता >> पान २

## मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसचे 'एकला चलो रे'; उमेदवारीसाठी इच्छुकांची भाऊगर्दी, ११५० अर्ज

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : महापालिका निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र लढण्याची तयारी केल्यामुळे काँग्रेस दुरावली आहे. परिणामी काँग्रेसमध्ये 'एकला चलो रे'चे वारे वाहू लागले असून निवडणुकीसाठी इच्छुकांचे अर्जही मागविण्यास सुरुवात झाली आहे. स्बळावर निवडणूक लढलो तर महापालिकेच्या २२७ प्रभागांतील कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याने उमेदवारीसाठी अर्जांची संख्या वाढू लागली आहे.

मुंबई महापालिकेत काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवावी असे वातावरण काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आहे. राज ठाकरे महाविकास आघाडीत आल्यास काँग्रेस बाहेर पडणार असे कार्यकर्त्यांनी गृहीत धरले आहे. त्यात पक्षाकडून इच्छुक उमेदवारांचे अर्जही मागविण्यात येत आहेत. उत्तर मध्य मुंबईतून ३०० हून अधिक अर्ज आले आहेत. तर वायव्य लोकसभा मतदारसंघातून २५० हून अधिक अर्ज आले आहेत. त्याचप्रमाणे अन्य चार लोकसभा मतदारसंघातून १०० ते १५० अर्ज भरण्यात आले असल्याने काँग्रेसमध्ये इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. महापालिकेची आरक्षण सोडत जाहीर होणार असल्याने अर्जास मुदतवाढ देण्यात आली असल्याचे काँग्रेस प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी सांगितले.

काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांच्यावर मुंबई महापालिका निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. काँग्रेसकडून मुंबईतील २२७ प्रभागांसाठी प्रमुख नेमण्यात आले आहेत. प्रत्येक प्रभागांत बैठका घेतल्या जात >> पान २

## व्हीव्हीपॅटचा वापर करायचा नसेल तर बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या

### उच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला निर्देश

**नागपूर/प्रतिनिधी** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका मतदार पडताळणी पावती प्रणाली (व्हीव्हीपॅट) शिवाय घेण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांच्या याचिकेवर नागपूर खंडपीठाने शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली. न्यायालयाने आयोगाला चार दिवसांच्या आत या संदर्भात आपले म्हणणे स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. ही याचिका न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. पवन दहाट आणि ॲड. निहालसिंग राठोड यांनी जोरदार युक्तिवाद करताना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच विविध प्रकरणांमध्ये व्हीव्हीपॅट प्रणालीची गरज अधोरेखित केली आहे.मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास टिकवण्यासाठी ही प्रणाली



आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

मतदानातील पारदर्शकतेचा मुद्दा

याचिकेमध्ये म्हटले आहे की, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे म्हणजेच इव्हीएम वापरताना मतदाराला आपले मत नोंदले गेले आहे की नाही याची खात्री मिळत नाही. व्हीव्हीपॅट प्रणालीमुळे प्रत्येक मतदाराला काही क्षणांसाठी त्याने कोणाला मत दिले याची पावती स्वरूपात झलक दिसते, ज्यामुळे मतदान प्रक्रियेवर विश्वास दृढ होतो. ''मतदार पडताळणी ही केवळ तांत्रिक सुविधा नसून ती लोकशाहीतील पारदर्शकतेचा पाया आहे, >> पान २




## नगरपरिषद निवडणुकीसाठी सूक्ष्म नियोजन करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला निवडणूक तयारीचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील ११ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या असून या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी निवडणूक पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करुन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले.

या आढावा बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार, जिल्हा सह आयुक्त पेंटे आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी आदर्श आचारसंहिता, प्रतिबंधात्मक आदेश, मनुष्यबळाचे व्यवस्थापन, मतदान आणि मतमोजणी विषयक तयारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, विविध भरारी पथकांच्या नियुक्त्या, मतदान केंद्रांवरील सोयीसुविधा, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट वाटपाचे व्यवस्थापन, मतमोजणी केंद्रावरील सोयीसुविधा, कायदा व सुव्यवस्था, विविध समित्यांच्या नेमणुका आदी विषयांचा आढावा घेवून सविस्तर चर्चा करण्यात आली.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने यंत्रणा सज्ज ठेवावे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे प्रतिबंधात्मक आदेश जारी करावे. मतदान केंद्रांवरील सोयीसुविधांची खात्री करावी. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्या. प्रचाराला सुरुवात होण्यापूर्वी विविध भरारी पथके कार्यान्वित करावी. नियंत्रण कक्ष स्थापन करुन मतदारांसाठी मदत क्रमांक जारी करावे. नगरपरिषद निवडणुकांसह जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सूक्ष्म




नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी या बैठकीत दिले.

>> पान २

## डिजिटल अरेस्ट सायबर गुन्ह्याच्या नवा फंडा

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार काही दिवसांपूर्वी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात तब्बल ११२ कोटी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. या आठ महिन्यात डिजिटल अरेस्टचे तब्बल २०८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल. डिजिटल अरेस्टचे गुन्हेगार शोधणे सायबर पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे कारण हे सर्व गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात आणोबते गुन्हा देखील आभासी पद्धतीने करतात. सायबर गुन्हेगार देशातील कोणत्याही भागातून किंवा अगदी परदेशातूनही हा गुन्हा करतात त्यामुळे त्यांना शोधणे पोलिसांना सहज शक्य होत नाही. सायबर पोलिस या गुन्हेगारांना शोधण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करत असतातच मात्र नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. भारतीय कायद्यात कोठेही डिजिटल अरेस्टला थारा नाही. आपल्या कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही याची नोंद नागरिकांनी घ्यायला हवी. पोलिस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा आपल्याला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. मात्र हे खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना याबाबत माहिती द्यायला हवी. डिजिटल अरेस्ट किंवा एकूणच सायबर गुन्ह्याविषयी शाळा महाविद्यालयात कार्यशाळा, प्रत्यक्षिके, प्रशिक्षणे, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार प्रसार करायला हवा. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडियातूनही याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. नागरिक सतर्क राहिले तरच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकणार नाही.

# बहुप्रतिक्षेत असलेली कृषी समृद्धी योजना २०२५-२६ राबवण्यास मान्यता : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## बळीराजाच्या उन्नतीसाठी कृषीमंत्र्यांचे आश्वासक पाऊल; अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निर्मितीसाठी गुंतवणूक करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यातून शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा (बीबीएफ) यंत्रांसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने पुढील तीन वर्षासाठी ५ हजार ६६८ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या अनुषंगाने आणि बदलत्या हवामानामुळे अतिवृष्टीसारख्या निर्माण होणाऱ्या संकटास सामोरे जाण्यासाठी कृषी विभागाने राबविलेली कृषी समृद्ध योजना शेतकऱ्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल असे त्यांनी सांगितले.



राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या ट्रॅक्टरचलित रुंद सरी वरंबा (बीबीएफ) यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी आणि मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन हे घटक अधिक विस्तृत स्वरुपात राबवून राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यत पोहोचविण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने शासन निर्णयान्वये उक्त घटकांची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. जास्तीत जास्त शेतक-यांना फायदा मिळण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या संकल्पनेतून या योजनेला विस्तृत स्वरुप मिळाले आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कृषी समृद्धी योजनेतून ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी, मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन या चार घटकांचा समावेश आहे. यामध्ये २५ हजार रुंद सरी वरंबा यंत्रासाठी १७५ कोटी, १४ हजार वैयक्तिक शेततळ्यासाठी ९३ कोटी, शेतकरी सुविधा केंद्र उभारणीसाठी ५ हजार कोटी आणि ५ हजार ड्रोनसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत विविध शेती उपयोगी यंत्र पुरवणे, जैविक निविष्ठ निर्मिती केंद्र उभारणे, प्लास्टिक अस्तरीकरण, शेततळे, एकात्मिक कीड नियंत्रण, अन्नद्रव्य घटक व्यवस्थापन, मृद परीक्षण प्रयोगशाळा उभारणी, शेतीसाठी ड्रोन या आदी बाबींचा समावेश आहे.

ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा (बीबीएफ) आणि शेततळ्यांसंदर्भात बोलताना मंत्री भरणे म्हणाले, राज्यभरात २५,००० बीबीएफ यंत्रांचा पुरवठा करण्यात येणार आहे.

त्यासाठी एक यंत्र दर हंगामात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावर काम करू शकते. परिणामी २५ लाख हेक्टर क्षेत्रावर ही पद्धत लागू करता येईल. तसेच बियाण्याचा वापर ३०-४० टक्के कमी आणि उत्पादनात १५-२० टक्के वाढ अपेक्षित असून यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ७० हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच, राज्यात १४,००० शेततळ्यांच्या बांधकामासाठी मान्यता दिली गेली आहे. त्याचसोबत, काळी चिकणमाती असलेली जमीन प्राधान्याने निवडली जाईल. वाहत्या पाण्यात किंवा दलदलीच्या भागात कुंड्या घेता येणार नाहीत. यामध्ये शेडच्या आकारानुसार १६ हजार ८६९ ते १ लाख ६७ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाणार आहे.

मंत्री भरणे म्हणाले, शासनाने २ हजार ७७८ शेतकरी सुविधा केंद्रे उभारण्यास मान्यता दिली आहे. प्रत्येक केंद्रासाठी सरासरी प्रकल्प खर्च ३ कोटी रुपये असून कमाल अनुदान मर्यादा १ कोटी ८० लाख रुपये ठेवण्यात आली आहे.

यामध्ये मृद परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खत उत्पादन केंद्र, भाडे तत्त्वावर अवजारे व ड्रोन उपलब्धता केंद्र, गोडाऊन व शीतसाखळी सुविधा, कीडनियंत्रण सामग्री व अन्नद्रव्य घटक याचा समावेश आहे. या नव्याने उभारण्यात येत असलेल्या शेतकरी सुविधा केंद्रांमुळे राज्यातील शेतकऱ्यांना सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. तसेच, केंद्र शासनाच्या नमो ड्रोन दिदी योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन याअंतर्गत राज्यात ५ हजार कृषी ड्रोन अनुदानावर दिले जातील. यामध्ये, ड्रोन किमतीच्या ५० टक्के किंवा ८ लाख रुपये अनुदान कृषी पदवीधरांना दिले जाईल. इतर लाभार्थ्यांना ४० टक्के किंवा ४ लाख रुपये अनुदान दिले जाईल. ड्रोन खरेदीसाठी, महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा लागेल.

योजनेसाठी कोण पात्र?

२०२५-२६ ते २०२७-२८ या तीन वर्षासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून अर्जदार राज्यातील सातबारा धारक असणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक फार्मर नोंदणी क्रमांक आवश्यक आहे. लाभार्थी शेतकऱ्याने कृषी विभागाच्या महाडीबीटीवर ऑनलाईन अर्ज केल्यावर प्रथम येणाऱ्यास प्रथम लाभ या तत्वावर लाभार्थी निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना डीबीटीतून थेट बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्या महाडीबीटीवर अर्ज करून लाभ घेऊ शकतात.

## गांधीजींचे सहकारी रेजिनाल्ड रेनॉल्ड्सचे वंशज बेंजामिन हडसन यांची प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांशी सदिच्छा भेट.

**मुंबई/प्रतिनिधी** :राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे जिवलग सहकारी व ब्रिटिश क्वेकर विचारवंत रेजिनाल्ड रेनॉल्ड्स यांचे वंशज बेंजामिन हडसन यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मुंबईतील टिळक भवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी गांधीवादी आणि क्वेकर परंपरेतील ऐतिहासिक संवाद, सांस्कृतिक वारसा आणि आजच्या सामाजिक, राजकीय संदर्भातील गांधी विचारांचे पुनर्मूल्यांकन या विषयांवर चर्चा झाली.

''अशा सांस्कृतिक आणि नैतिक देवाणघेवाणीमुळे महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि मानवतेच्या सार्वत्रिक संदेशाचे पुनरुज्जीवन होते. रेजिनाल्ड रेनॉल्ड्स यांच्यासारख्या सहकार्यांच्या वंशजांच्या भेटीमुळे क्वेकर आणि गांधीवादी विचारसरणीचे वैश्विक बंध मजबूत होतात'', असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

हडसन यांनी आपले पणजोबा रेजिनाल्ड रेनॉल्ड्स यांच्या महात्मा गांधीजींसोबतच्या ऐतिहासिक नात्याचा उल्लेख करत भारतातील गांधीवादी मूल्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. रेनॉल्ड्स हे ढहश थहळींश डरहळली ळप खपवळर या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक असून, त्यांनी ब्रिटिश साम्राज्यवादावर तीव्र टीका करत भारताच्या स्वातंर्त्यलढ्यातील नैतिक भूमिकेचे समर्थन केले होते. त्यांनी ढहश ढ्रींश डीॢ ष ऋक्षपवहळ आणि अ टींशीं षी ऋक्षपवहळ यांसारख्या पुस्तकांद्वारे महात्मा गांधींच्या जीवन आणि कार्याचा जागतिक पटावर प्रसार केला होता.

पान १ वरून...

### पुण्यातील जमीन

त्यांच्या विरुद्ध कारवाईची शिफारस करणे.

जर अनियमितता झालेली आढळली, तर सदरील जमीन पूर्वस्थितीवर आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे पुन्हा उद्भवू नयेत यासाठी उपाययोजना सुचविणे..

समितीमध्ये कोण कोण?

अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक व नोंदणी) - अध्यक्ष
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे - सदस्य
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे - सदस्य
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे - सदस्य
जिल्हाधिकारी, पुणे - सदस्य
सह सचिव (मुद्रांक), महसूल व वन विभाग, मुंबई - सदस्य सचिव

### अखेर पुण्यातील जमिनीचा व्यवहार

स्वकीयांना, नातेवाईकांनाही सांगतो, नियमाच्या बाहेर जाऊन केलेलं मला चालणार नाही, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

मी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात नियम तोडून काम केलेले नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले पण ते सिद्ध झाले नाहीत. त्याच्यात अनियमितता होती, श्वेतपत्रिका काढली हे आपल्याला ज्ञात आहे. अधून मधून कमेंटस करुन टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. या व्यवहारात मला अजिबात काही माहिती नव्हते. मला माहिती असते तर लगेच सांगितले असते मला विचारुन व्यवहार झालेला आहे. साहजिकच विरोधक आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणार, त्यामध्ये दुमत नाही. मात्र, मला आजच माहिती मिळाली की, याप्रकरणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. पुढील १ महिन्याच्या आत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे.

या व्यवहारात माहिती घेतली, चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरला होते.मी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधला. जरी माझ्या घरातल्या जवळच्यांचा विषय असला तरी तुम्ही राज्याचे प्रमुख आहात. जे काही नियमाप्रमाणं करावं लागेल, चौकशी करावी लागेल, समिती नेमायची असेल ते करा माझा त्या गोष्टीला पाठिंबा राहील. आरोपातील वस्तूस्थिती जनतेला कळणं आवश्यक असते. या व्यवहारात रुपया देखील दिला गेला नाही. मोठे आकडे सांगितले गेले, गोष्टी सांगितल्या गेल्या. परंतु, मला आज जे कळाले जो काही व्यवहार झाला होता तो रद्द करण्यात आला आहे.

### पार्थ पवारांचा 'जिजाई' बंगला

तर दुसरीकडे या जमिन खरेदी प्रकरणात पार्थ पवार याचे मामेभाऊ आणि व्यावसायिक भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय.

दरम्यान, पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरण समोर आल्यानंतर विरोधकांनी अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. अंबादास दानवे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटलंय की, मुलगा पुण्यात ३०० कोटींचा व्यवहार करतो, हे पित्याला ज्ञात नाही आणि जेव्हा या मुलाचे वडील पुण्याचे पालकमंत्री आहेत. तुमचं तुम्हाला तरी पटतंय का हे बोलताना? बाजार भावापेक्षा कमी दरात जमीन घेतली गेली आहे, खडसेंचा राजीनामा घेतला गेला होता. चौकशी होईपर्यंत नैतिकता राखून तुम्हीही राजीनामा द्या. न्या. झोटिंग समितीच्या धर्तीवर कोरेगाव पार्क प्रकरणातही समिती मुख्यमंत्री महोदयांनी नेमावी, अशी मागणी त्यांनी केलीय.

### शिष्यवृत्ती परीक्षेचा

चाचणीत तर्कसंगती, वर्गीकरण, सहसंबंध, आरशातील प्रतिमा आणि कूटप्रश्न या प्रकारचे प्रश्न विचारले जातील.

सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी:

प्रथम भाषा (मराठी) विषयात आकलन, शब्दसंपत्तीवरील प्रभुत्व, कार्यात्मक व्याकरण आणि पहिली ते सातवीच्या मराठी विषयांशी संबंधित सामान्य ज्ञान विचारले जाणार आहे. गणितात संख्याज्ञान, संख्यांवरील क्रिया, भूमिती, मापन, सांख्यिकी, व्यावहारिक गणित आणि बीजगणित या घटकांचा समावेश आहे. इंग्रजी तृतीय भाषेत शब्दसंपदा, व्याकरण, सर्जनशील लेखन, वाचन कौशल्य, शब्दकोडी आणि भाषा अभ्यास यांचा अभ्यासक्रमात समावेश आहे.याशिवाय बुद्धिमत्ता चाचणीत तर्कसंगती, अनुमान, जलप्रतिबिंब, आकृतीचे पृथःकरण, मनोरे आणि सांकेतिक भाषा यांसारख्या घटकांवर आधारित प्रश्न विचारले जाणार आहेत. राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, त्यांच्या बौद्धिक क्षमतेला नवे वळण देणारी ठरेल.

### मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसचे

असून उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. महापालिकेत आघाडी करायची की स्वबळावर निवडणूक लढवायची याचा अंतिम निर्णय झालेला नाही. हा निर्णय काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून घेण्यात येणार आहे. मात्र स्थानिक पातळीवर काँग्रेस नेते, पदाधिकारी व कार्यर्त्यांकडून सर्व २२७ प्रभागांसाठी तयारी सुरू असल्याचे प्रवक्ते राजहंस यांनी सांगितले.

### व्हीव्हीपॅटचा वापर करायचा

'' असे याचिकाकर्त्यांनी नमूद केले आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, जर राज्य निवडणूक आयोगाने कोणत्याही कारणास्तव मशीन उपलब्ध करून देऊ शकत नसल्यास, निवडणुका पारंपरिक मतपत्रिकांच्या माध्यमातून घेण्यात याव्यात. ''लोकशाहीत विश्वास हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. तो तांत्रिक सुलभतेच्या नावाखाली दुर्लक्षित करता येणार नाही,'' असेही याचिकेत नमूद आहे.

कायदेशीर पार्श्वभूमी काय?

सर्वोच्च न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या निर्णयात प्रत्येक मतदारसंघातील काही मतदान केंद्रांवर वव्हीव्हीपॅट पडताळणी अनिवार्य केली होती. त्या निर्णयाचा दाखला देत गुढे यांनी म्हटले आहे की, राज्य निवडणूक आयोगाला हीच भूमिका स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी देखील लागू करणे आवश्यक आहे. अन्यथा मतमोजणीच्या निष्कर्षावर शंका निर्माण होऊन संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते. या याचिकेनंतर काँग्रेसकडून राज्यभर या विषयावर जनजागृती मोहीम राबविण्याची तयारी सुरू आहे. ''मतदार पडताळणीशिवाय निवडणूक म्हणजे डोळ्यावर पट्टी बांधून लोकशाही चालवण्यासारखे आहे,'' असे गुढे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, उच्च न्यायालयाने नोटीस बजावल्यामुळे स्थानिक निवडणुका होण्यापूर्वी या महत्त्वाच्या प्रश्नावर कायदेशीर स्पष्टता येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कायदेशीर तज्ञांचे म्हणणे आहे की, जर न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या मुद्द्याला मान्यता दिली, तर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळापत्रकावरही परिणाम होऊ शकतो. कारण, व्हीव्हीपॅट मशीनच्या वापरासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय तयारी करण्यास वेळ लागणार आहे.

निवडणुका लोकशाहीच्या मुळाशी असतात, आणि त्या पारदर्शकतेशिवाय अर्थहीन ठरतात, असा सर्वसाधारण सूर राजकीय आणि कायदेविषयक वर्तुळात उमटत आहे. आता न्यायालयीन सुनावणीच्या पुढील टप्प्यात या मुद्द्याचा निकाल कोणत्या दिशेने जाईल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### शंकर महाराजांच्या नावाखाली १४ कोटींची फसवणूक, तिघांना पोलिसांनी घेतले ताब्यात!

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे शहराला विद्येचे माहेरघर असे म्हटले जाते. परंतु पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून सायबर गुन्हे तसंच भोंदू बाबांकडून होणाऱ्या फसवणुकीच्या गुन्ह्यात वाढ होत आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली होती. शंकर महाराज अंगात येतात, असं भासवून दिपक जनार्दन खडके, वेदिका पंढरपूरकर व कुणाल पंढरपूरकर यांनी पुण्यातील डोळस या कुटुंबाची १४ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तीन जणांना नाशिक येथून ताब्यात घेतले आहे. फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हा दाखल : या प्रकरणी पुणे पोलिसांनी दिपक जनार्दन खडके, वेदिका कुणाल पंढरपूरकर व कुणाल पंढरपूरकर यांच्यावर कोथरूड पोलीस स्टेशन इंथ गुन्हा दाखल केला असून त्यांना नाशिक येथून ताब्यात घेतलं आहे. याबाबत पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं की, ''१४ कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून क्राइम ब्रांचच्या पथकानं आज सकाळी नाशिकमधून तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींना पुण्यात आणण्यात येत आहे. तसंच या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे,'' अशी माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. पत्र पाठवून गुन्हा दाखल करण्याची मागणी : दरम्यान, दोन दिवसांपूर्वी शंकर महाराज अंगात येतात, असं भासवून पुण्यातील दिपक डोळस यांच्या कुटुंबाची १४ कोटी रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी पीडित कुटुंबानं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना पत्र पाठवून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. तसेच काल (६ नोव्हेंबर) देखील या कुटुंबीयांनी पोलिसांची भेट घेतली होती. यानंतर आता या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

### शिक्षक पात्रता परीक्षेबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

जालना –महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा चअहअढएढ २०२५ दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.या अनुषंगाने परिक्षेच्या तयारी विषयक आढावा आज दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नु, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, शिक्षणाधिकारी माध्यमिक बाळासाहेब खरात, शिक्षणाधिकारी योजना श्रीमती लता सानप, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालनाचे ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रकाश मांटे, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक गिरीश पुजारी , सुभाष भालेराव, विनया वडजे, रवींद्र जोशी , पी. एस. रायमल, अर्जुन पवार , संगीता गिमेकर यांची उपस्थिती होती. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परिक्षा केंद्रावर व परिक्षा हॉल सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असावेत, परिक्षेत अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रत्येक परीक्षार्थींची तपासणी करण्यात यावी, परिक्षा केंद्रावर परिक्षार्थींसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात यासह अन्य निर्देश दिले. सदर परीक्षेस जालना जिल्ह्यातून पेपर १ साठी ३८३५ व पेपर २ साठी ४५०८ परीक्षार्थी १५ परिक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत.

# सिंधुदुर्गमध्ये महायुती नाही; दीपक केसरकर यांची माहिती

## कणकवलीत शिवसेना ठाकरे आणि शिंदे पक्ष एकत्र येण्याच्या हालचाली

**दैनिक आपला विदर्भ**



**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी** : आम्ही भाजपापुढे महायुतीचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु त्यांना नको असेल तर आम्ही स्वबळावर लढण्यास तयार आहोत. मात्र त्यांनतर होर्णाया परिणामांना आम्ही जबाबदार राहणार नाही, असे संकेत देत आगामी काळात होर्णाया नगरपरिषद निवडणुकीत युती तोडत असल्याचे आमदार दीपक केसरकर यांनी गुरूवारी जाहीर केले. ते सावंतवाडीत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. दरम्यान येर्णाया पालिका निवडणुकीत सावंतवाडीतून कोणी लढावे हे लोकांना अपेक्षित असेल तर त्यांनी मला थेट कळवावे. या ठिकाणी लोकांच्या पसंतीचा उमेदवार आम्ही देणार आहोत. सावंतवाडी, वेंगुर्ल्यात निश्चितपणे आम्ही दिलेले उमेदवार जनता निवडून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हाप्रमुख संजू परब, परिक्षीत मांजरेकर, क्लेटस फर्नांडिस आदी उपस्थित होते.

''चॉईस''चा उमेदवार देणारा – दीपक केसरकर म्हणाले, आम्ही आणलेल्या योजना आणि नगरपालिकेत केलेली विकास कामे यांच्या जोरावर मते मागू. मात्र या परिस्थितीत कोणाच्याही विरोधात बोलणार नाही याची आम्ही काळजी घेऊ, असंही केसरकर यावेळी म्हणाले. नगरपालिकेत मी कधीही राजकारण केलं नाही. पालिका हे मी माझं घर समजतो. या ठिकाणी सर्वसामान्य लोकांना पटेल असा त्यांच्याच ''चॉईस''चा उमेदवार देणार आहोत. जेणेकरुन नगरपालिकेचे काम चांगले चालावे, एवढीच आमची अपेक्षा आहे.

ठाकरे आणि शिंदे पक्ष एकत्र येण्याच्या हालचाली – दुसरीकडे कणकवलीत शिवसेना ठाकरे आणि शिंदे पक्ष एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून हे सर्वजण शहर विकास आघाडीच्या माध्यमातून ही मोट बांधताना दिसतात. याला उध्दव सेनेचे नेते संदेश पारकर यांनीही दुजोरा दिला असून फक्त शिंदे सेनाच नाही तर अन्य पक्ष सोबत घेण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचाली वेगवान झाल्या आहेत. भाजपाने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा नारा दिला. कणकवली नगरपंचायत निवडणुकीत भाजपा आमदार नितेश राणे यांना रोखण्यासाठी शिंदे शिवसेना आणि महाविकास आघाडी एकत्र येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे.

राजकीय समीकरणात मोठा बदल – सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आगामी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांपूर्वी राजकीय समीकरणात मोठा बदल घडवून आणणारी घडामोड कणकवलीत दिसून आली आहे. शिवसेना ठाकरे आणि शिंदे याच्या नेत्यांमध्ये गुप्त बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात चांगलीच खळबळ माजली आहे. कणकवली नगरपंचायतीसाठी मंत्री नितेश राणे सर्व ताकद पणाला लावणार असून त्याना थोपवण्यासाठी आता सर्व पक्ष एकवटल्याचे दिसून येत आहेत.

## हायप्रोफाईल सोसायटी हादरली: चारित्र्याच्या संशयातून पतीनं केली पत्नीची हत्या अन् मग केला आत्महत्येचा प्रयत्न

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी** : चारित्र्याच्या संशयातून राहत्या घरातच पतीनं पत्नीची हत्या केल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना कल्याण तालुक्यातील वरप गावातील हायप्रोफाई सोसायटी असलेल्या विश्वजीत प्रिअर्स सोसायटीत घडली. खळबळजनक बाब म्हणजे पत्नीची हत्या केल्यानंतर पतीनं त्याच चाकूनं स्व:तावर वार करत आत्महत्येचा प्रयत्न केला. याप्रकरणी कल्याण ग्रामीण तालुका पोलीस ठाण्यात पतीवर हत्येचा गुन्हा दाखल करत पोलिसांनी तपास सुरु केला आहे. विद्या संतोष पोहळ (४०) असं मृत्यू झालेल्या पत्नीच नाव आहे. तर संतोष पोहळ (४१) असं पत्नीला ठार मारून गंभीर जखमी झालेल्या पतीच नाव आहे. पतीची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी दिली आहे.

महिलेच्या खुनानं हायप्रोफाई सोसायटी हादरली : मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पती संतोष पोहळ हा मृतक पत्नी आणि दोन मुलांसह कल्याण मुरबाड मार्गावरील वरप गावातील विश्वजीत प्रिअर्स या आलिशान सोसायटीत राहत होता. हल्लेखोर संतोष हा ड्रायव्हर म्हणून कार्यरत होता. तर त्याची पत्नी मृतक विद्या ही टाटा मोटर्समध्ये कार्यरत होती. त्यातच काही दिवसांपासून दोघांमध्ये चारित्र्याच्या संशयावरून सतत वाद सुरू होते. याच वादातून पुन्हा गुरुवारी रात्री १० वाजताच्या सुमारास राहत्या घरातच वाद विकोपाला गेला. यावेळी रागाच्या भरात संतोषनं धारदार चाकूनं पत्नीची हत्या केली, त्यानंतर स्वत:वरही वार करत आत्महत्येचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच कल्याण तालुका ग्रामीण हद्दीतील म्हारळ पोलीस चौकीचे अधिकारी दत्तात्रय नलावडे आणि पथक घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी पंचनामा केला. घटनेचा तपास सुरु केला असता, प्राथमिक तपासात वैवाहिक वाद आणि संशयातून ही घटना घडल्याचं स्पष्ट झालं आहे. तर गंभीर जखमी अवस्थेत दोघांनाही तत्काळ उल्हासनगर येथील मध्यवर्ती शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, पत्नी विद्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर संतोषची प्रकृती चिंताजनक असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं.

रहिवाशांमध्ये भीती आणि अस्वस्थता : या धक्कादायक घटनेमुळे कल्याण तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. शांत आणि सुरक्षित मानल्या जाणाऱ्या विश्वजीत प्रिअर्ससारख्या प्रतिष्ठित सोसायटीत घडलेल्या या प्रकारामुळे रहिवाशांमध्ये भीती आणि अस्वस्थता निमर्ण झाली आहे. या गंभीर घटनेचा अधिक तपास पोलीस पथक करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी दिली आहे.

# पत्रकार अय्यूब राणा यांना धमकी : संदेश देण्याअगोदर केले व्हिडिओ कॉल, सायबर सेलने सुरू केला तपास

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय स्तरावरील, प्रसिद्ध शोध पत्रकार आणि स्तंभलेखिका राणा अय्युब यांना एका अज्ञात आंतरराष्ट्रीय नंबरवरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. ही धमकी व्हाट्सअॅपवर मिळाली असून, ज्या नंबरवरुन धमकी मिळाली आहे, त्याच्या डीपीवर गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याचा फोटो दिसत होता, अशी माहिती अय्यूब राणा यांनी पोलिसांना दिली आहे. अय्यूब राणा या नवी मुंबईतील कोपरखैरणे परिसरातील सेक्टर १४ इथं राहत आहेत. त्यांनी या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी दखल घेऊन गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे हा संदेश पाठवल्यानंतर धमकी देणाऱ्यानं राणा यांना रायफलचे बंदुकीचे व्हिडिओ देखील पाठवले.


धमकीचे कॉल आणि संदेश : पत्रकार अय्यूब राणा या कोपरखैरणे इथल्या सेक्टर १४ मध्ये राहतात. २ नोव्हेंबरला संध्याकाळी ७:३० च्या सुमारास त्या क्रिकेटची मॅच पाहत होत्या, तेव्हा एका आंतरराष्ट्रीय नंबरवरून अय्यूब राणा यांना सतत व्हाट्सअॅपवरून व्हिडिओ कॉल येऊ लागले. त्यांनी या कॉलकडं दुर्लक्ष केले. त्यामुळे कॉल करणाऱ्या व्यक्तीनं अय्यूब यांना धमकीचा संदेश पाठवला आणि मारण्याची धमकी दिली.

काय होते त्या धमकीच्या संदेशात : अय्यूब राणा यांना व्हॉट्सअॅपवरून प्राप्त झालेल्या धमकीच्या संदेशात १९८४ च्या शीख दंगली आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येचे समर्थन करणारे लेख लिहा, ज्यांनी इंदिरा गांधी यांना मारलं त्यांच्याबद्दल चांगलं लिहा. जर इंदिरा गांधी यांच्या हत्येचे समर्थन करणारे लेख लिहिण्यास नकार दिला, तर नवीन वर्ष साजरे करण्यासाठी तुमच्या घरी गोळीबार करणारे शुटर पाठवले जातील, असं लिहिलं होतं. विशेष म्हणजे अयुब राणा यांच्या घराचा पत्ता देखील या धमकीमध्ये लिहिला गेला होता. त्याचबरोबर अय्यूब राणा यांचे वडील आजमगड इथं लग्नासाठी गेले आहेत. त्या जागेचे नाव देखील लिहून त्यांना देखील मारून टाकू असं धमकीच्या संदेशात लिहिलं. योगी आणि त्याचे पोलीस देखील काही करू शकणार नाही, असं देखील या संदेशात नमूद करण्यात आलं आहे. खाली हॅरी किलर असं नाव लिहिलं होते.



कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल : ''या घटनेनंतर अय्यूब राणा यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना कळवलं. त्यानंतर कोपरखैरणे पोलीस स्टेशनमध्ये एक अदखलपात्र (एनसी) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी हे प्रकरण सायबर सेलकडं पाठवण्यात आलं आहे. पोलिसांनी या आंतरराष्ट्रीय नंबरची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली असून आयपी एट्रेसवर लोकेशन शोधण्याचं काम सुरू आहे. राणा यांना मिळालेला धमकीचा कॉल हा इंटरनॅशनल कॉल असल्यामुळे त्याचा सखोल तपास सुरू आहे,'' असे कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांनी सांगितले.

## शब्दकोडे क्र. 04



आडवे शब्द

२. दक्षता ५. प्रश्नोत्तरांचे जुगलबंदी ९. उपेक्षित १०. महिना १२. शासन, शिक्षा १४. जाडसर दळलेला गहू १६. कस्तुरी देणारे हरीण १९. नजरबंदीचा खेळ करणारा २०. परंपरागत विचारसरणीचा २३. भांडण २४. गुंड २५. समुद्रकिनारा २९. प्राचीन ३०. दुधाचे पक्वान्न ३१. झाड ३३. उपकारांची जाणीव असलेला ३४. थट्टेखोर ३६. स्त्री ३९. बेलगाम, दावे ४१. रंग उडालेला ४२. काश्मीरचे प्रसिद्ध फळ ४५. सरावाने निष्णात ४८. जास्त ५०. नौका ५१. दया ५२. दरोडेखोर ५३. राग ५४. पुष्टी ५६. परंपरा ५८. समस्त ५९. गर्दी ६०. रागावलेला ६२. खळगा ६४. कोलकात्याचे जुने नाव ६६. नकारात्मक वृत्ती जोपासणारा ६८. बाग, अरण्य ६९. डाग ७१. विनोद (इंग्रजी) ७२. साय ७५. संकुचित वृत्तीचा ७७. हडकुळा ७८. बेळगाव सध्या या राज्यात आहे ७९. बळेच घोड्यावर चढवलेला

उभे शब्द

१. अप्राय २. धोकादायक ३. विष्णूची पत्नी ४. भाजून काढणारे ६. मतभेद, वाद ७. माळ, सर ८. वाचाळ, बहुभाषी ११. पन्ह्याचे फळ १३. धरती १५. वायू १७. प्रशंसा १८. दोन्हीकडून बडवला जाणारा १९अ. फजिती २०. समंजस २१. व्यवस्थित २२. प्रेम २५. अमसुलाचे गरम पेय २६. युद्धभूमी २७. हा कोल्हापूरचा तांबडा-पांढरा प्रसिद्ध २८. शेवट ३०. अडथळा ३२. कोरडा ३५. पांथस्थ ३७. काटा ३८. रामदासांचा ग्रंथराज ३९. आनंद ४०. महिला ४१. प्राक्तन ४३. चीर, सापट ४४. चैन ४६. अकबराशी लढणारा स्वाभिमान राजपूत राजा ४७. भेग ४९. 'स्वामी' कादंबरीचे नायक ५१. कंबर ५४. दासी ५५. काळिमा ५७. ही शाबासकीची असेल तर चांगली! ६१. साहित्यिक ६१अ. लग्नात वाटला जाणारा ६२. प्रत्येक ६३. पुष्कळ ६५. ध्येय ६७. सारखा ६८. माता ७०. पिशाच्च ७१. 'रमी'तील महत्त्वाचे पान ७३. झुंजार ७४. स्तुतीपाठक ७६. तांदळाचा एक पदार्थ

### शब्दकोडे क्र. 03 चे उत्तर

आडवे उत्तर

३.भस्म ४.सुतराम ७.द्वारका १०.संत ज्ञानेश्वर १२.रंग १४.मका १५.ताक १६.तहहयात १९.केरसुणी २१.सरूप २३.विशद २६.जरा २८.जीवन २९.जलचर ३१.कुल ३२.नमक ३५.कायम ३६.जवळीक ३७.करवत ३९.हुज्जत ४०.नात ४१.फार ४३.हयगय ४७.अवगत ५०.करमणूक ५२.कवायत ५३.गाजरपारखी ५५.वाकी ५६.गदा ५७.सुरा ५८.मौन ६०.अस्वीकृत ६२.गौरी ६३.साम ६५.गीतांजली ६७.मास ६८.ऋण ६९.उपहार ७०.बरा ७१.मारा ७२.जीत ७३.गर्व ७४.कडा ७६.मिंधा ७७.चीन ७९.रिपु ८०.मार ८१.नश्वर ८२.विपरीत ८३.अघळपघळ

उभे उत्तर

१.कृतक २.साने गुरुजी ३.भरत ५.तरंत ६.राग ८.रमणी ९.काका १०.संतापजनक ११.दहशत १३.द्वार १७.हवि १८.याद २०.सुधा २२.पवना २४.मलम २५.अलक २७.रामरक्षा २९.जयजयकार ३०.रजत ३१.कुळीथ ३३.कव ३४.लज्जत ३८.तफावत ४०.नायक ४२.रग ४४.धमकी ४५.सुकर ४६.निकड ४७.अयशस्वी ४८.तगादा ४९.सुरसुरी ५१.रवानगी ५४.पारा ५६.गत ५९.लाजरा ६०.असमाधान ६१.कृमी ६२.गौण ६३.साप ६४.महाग ६६.तांबडा ६८.ऋत ६९.उर्वरित ७२.जीन ७४.कवळ ७५.गरळ ७७.चीर ७८.तूप ८०.माघ

विविध वृत्त...

## कुष्ठरोग शोध अभियानाला १७ नोव्हेंबर पासून सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) सहसंचालक यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान २०२५ ला सुरुवात होत आहे. ही मोहिम १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभर राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेचा प्रमुख उद्देश सन २०२७ पर्यंत ''शुन्य कुष्ठरोग प्रसार'' हे शासनाने निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करणे हा आहे. समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरित आणि योग्य उपचार मिळावेत, तसेच कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर व्हावेत, यासाठी ही व्यापक मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत आशा कार्यकर्त्या व पुरुष स्वयंसेवकांची विशेष पथके गावोगावी, घराघरात जावून सर्वेक्षण करणार आहेत. संशयित रुग्णांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांना उपचारासाठी आरोग्य सेवेशी जोडले जाणार आहे.

''कुष्ठरोग'' हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. त्यामुळे समाजातील नागरिकांनी कुष्ठरोगाबद्दल भीती बाळगू नये. संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित आरोग्य कर्मचाऱ्यांशी तसेच अधिक माहितीसाठी सहायक संचालक, आरोग्य सुविधा (कुष्ठरोग), बुलढाणा किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

## बुलढाण्यात गर्भलिंग निदानप्रकरणी नॅचरोपॅथी डॉक्टर ताब्यात, पीसीपीएनडीटी पथकाची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बेकायदा गर्भलिंग निदान केल्याच्या संशयावरून सुंदरखेडमधील तार कॉलनीतील एका नॅचरोपॅथी डॉक्टरच्या घरावर जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आदेशानुसार पीसीपीएनडीटी पथकाने ६ नोव्हेंबरला छापा मारून या डॉक्टरला शहर पोलिसांनी ताब्यात घेतलं असुन डॉक्टर वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुलढाणा शहराला लागूनच असलेल्या सुंदरखेड येथील तार कॉलनीमध्ये डॉ .कैलास गवई हा नॅचरोपॅथी घरातच अवैधरित्या गर्भलिंग निदान करीत होता. या माहितीवरून जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.दत्तात्रय बिराजदार यांनी कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पीसीपीएनडीटी पथकाने ६ नोव्हेंबरला धाड टाकली. यावेळी कैलास गवईला ताब्यात घेऊन चौकशी करून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिला व बालविकास कार्यालयात 'वंदे मातरम्'राष्ट्रीय गीताचे समुहिक गायन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : प्रसिध्द लेखक व कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित देशाचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' या गीताला आज १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्य शासनाच्या निर्देशानुसार महिला व बालविकास कार्यालयात वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास अधिकारी अमोल डिगुले, विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## उदयपूरमध्ये होणार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडाचे लग्न!: अभिनेत्रीने स्थळ शोधण्यास सुरुवात केली, पुढच्या वर्षी लग्न करू शकते

**मुंबई/प्रतिनिधी** : रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा सध्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहेत. पूर्वी असे वृत्त होते की, त्यांचा साखरपुडा झाला आहे आणि ते फेब्रुवारीमध्ये लग्न करतील. आता असे म्हटले जात आहे की, त्यांचे लग्न उदयपूरमध्ये होईल. या कारणास्तव, रश्मिका योग्य ठिकाण निवडण्यासाठी उदयपूरला गेली.

हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, रश्मिका अलीकडेच उदयपूरमध्ये आली आणि तिने संभाव्य लग्नाच्या ठिकाणांना भेट दिली. तिने शहरात तीन दिवस घालवले, विविध ठिकाणांची कसून तपासणी केली. तथापि, तिने कोणतेही ठिकाण बुक केले आहे की नाही याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

दरम्यान, इंडिया टुडेने असाही दावा केला आहे की, विजयच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले की हे जोडपे पुढच्या वर्षी लग्न करणार आहे. हे लग्न दक्षिण भारतीय आणि राजस्थानी परंपरेनुसार होईल. लग्नाला फक्त कुटुंबातील सदस्य आणि जवळचे मित्र उपस्थित राहतील.

# लोणार सरोवरात मासे निसर्गात बदल की संकटाची चाहूल?

## लोणार सरोवर बदलतेय का स्वरूप? प्रशासन सतर्क!

## लोणार सरोवरात खळबळ जैवविविधतेला धोका!



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या खाऱ्या पाण्याच्या लोणार सरोवरात आता चक्क मासे आढळले आहेत... आणि त्यामुळे या सरोवरातील जैवविविधता धोक्यात आली आहे. सरोवराचं पाणी गोड होण्याची शक्यताही तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

जागतिक पातळीवर ओळख असलेलं खाऱ्या पाण्याचं लोणार सरोवर... आणि आता या सरोवरात आढळलेले मासे झालायेत चर्चेचा विषय. या खाऱ्या सरोवरात आजवर सूक्ष्मजीवसुद्धा आढळले नव्हते. मात्र आता पाण्याच्या रासायनिक गुणधर्मात बदल होत असल्याचं तज्ज्ञ सांगतायत.

यंदा पाण्याची पातळी वाढली असून, पातळी १०-११ वरून ८-९ वर आली आहे, तसेच कमी झाल्याने हे पाणी गोड होत असल्याची चिन्हं दिसतायत. त्यामुळे सरोवरातील खारे गुणधर्म कमी होऊन जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे.

हे सरोवर पर्यटक आणि संशोधकांसाठी मोठं आकर्षण केंद्र असून, आता त्याच्या पर्यावरणीय रचनेत बदल होत असल्याने प्रशासनाने लक्ष घालणं आवश्यक असल्याचं मत व्यक्त होतंय.



लोणार सरोवरात मासे आढळल्याची बाब आमच्या निदर्शनास आली आहे. या बदलामागचं कारण शोधण्यासाठी तज्ज्ञांची टीम नेमण्यात आली आहे. संपूर्ण तपासणी करून योग्य उपाययोजना करण्यात येईल.

-डॉ. किरण पाटील, जिल्हाधिकारी बुलढाणा

## विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाचा विजय देशातील मुलींसाठी प्रेरणादायी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी** : भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक म ुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांना प्रत्येकी २ कोटी २५ लाख, तर प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना २२ लाख ५० हजार आणि सर्व सहकारी यांना प्रत्येकी ११ लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मध्ये प्रथमच भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा वर्षा या शासकीय निवासस्थानी सत्कार केला. गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एडल्जी, ॲनालिस्ट अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक सपोर्ट अपर्णा गंभीरराव, ऑपरेशन मॅनेजर मारुफ फजानदार, मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे, ममता शिरसुल्ला यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे उपस्थित आहेत.

सत्कारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विश्वचषकात भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. याचा संपूर्ण भारतीयांना अभिमान आहे. या विजयाने भारताचा गौरव वाढवला आहे. सुरुवातीच्या काही पराभवानंतर संघाने केलेली पुनरागमनाची कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रत्येक खेळाडूने कुठल्या ना कुठल्या सामन्यात निर्णायक भूमिका बजावली. प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करावे लागेल.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'वंदे मातरम्' राष्ट्रीय गीताचे सामुहिक गायन



**बुलढाणा/प्रतिनिधी** : प्रसिध्द लेखक व कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित देशाचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' या गीताला आज १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार, जिल्हा सह आयुक्त पेंटे आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## माझ्या नवऱ्याला महिन्यापासून दारु पाजून जरांगेविरुद्ध षडयंत्र रचले, अमोल खुणेच्या बायको, आईने हंबरडा फोडला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडेंच्या सांगण्यावरुनच रचण्यात आल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. यामुळे सबंध राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गेवराई येथून जालना पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. गेवराई तालुक्यातील धानोरा येथील अमोल खुणे यांचा या अटकेत समावेश आहे. याबाबत अम ोल खुणेच्या पत्नीने प्रतिक्रिया दिली आहे, माझ्या नवऱ्याला महिन्यापासून दारु पाजून मनोज जरांगे यांच्या विरुद्ध षडयंत्र रचल्याची माहिती पत्नीने दिली आहे.

मागील एक महिन्यापासून माझ्या पतीला दारु पाजत होते. त्या नशेम ध्ये त्यांच्याकडून हे सगळे करून घेतले जात होते. मात्र माझे पती मराठा आंदोलक जरांगे पाटलांचे सुरुवातीपासून कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये व स्टेटसला नेहमी जरांगे पाटलांचे फोटो असतात. ते जरांगे पाटलांना देव मानतात. माझ्या पतीला या प्रकरणात अडकवलं जात आहे. त्यांचा काहीही संबंध नाही, असा धक्कादायक दावा आरोपी अमोल खुणे याची पत्नी आणि आईने केला आहे. त्यामुळे या प्रकरणात ट्विस्ट निर्माण झाला आहे. माझ्या मुलाचा या प्रकरणात काहीही संबंध नाही, असे म्हणत अमोल खुणेच्या आईला अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळाले. याप्रकरणी आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या दोघांना जालना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या दोन जणांनी जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचत असल्याची तक्रार जालना पोलिसांकडे बीडच्या काही कार्यकर्त्यांनी केली होती. या तक्रारीवरून जालना गुन्हे शोध पथकाने दोघांना ताब्यात घेतलं असून सध्या त्यांची चौकशी सुरू आहे. या प्रकरणावर मनोज जरांगेंनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

**नेमके काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?**

माझे आणि धनंजय मुंडेचे वैर नाही, त्याने जी घटना करायला नको होती त्याने ती केली आहे, हा चेष्टेचा विषय नाही. त्याने परिस्थिती मर्यादेच्या पुढे नेली, राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही. मला माहिती मिळाली होती मी ती पोलीस प्रशासनाला सांगितली. घातपाताच्या प्रकरणात आठ-दहा जण आहेत, त्यात धनंजय मुंडे पण आहे. त्याप्रकरणाची चौकशी व्हायला नको का? असा सवाल जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. धनंजय मुंडे नार्को टेस्ट करायचं म्हणत असेल तर मी पण नार्कोटेस्ट करुन घ्यायला तयार आहे. उद्या मी गृहमंत्रालयात, कोर्टात, पोलीस अधीक्षक कार्यालय, कलेक्टर ऑफिसमध्ये जाणार आणि नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार आहे. धन्या मी तुझ्यासारखा नाही, मी जातवाण आहे, आरोप नाही केले. मी असे खुनाचे, घातपात करण्याचे आरोप नाही करु शकत. नार्को टेस्टला सगळ्यात आधी माझा अर्ज जाईल, तू काय सीबीआयची मागणी करतो? असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# मेहकरमध्ये बालिकेच्या अवशेषांमुळे खळबळ; पोलिसांचा मोठा खुलासा घातपात नव्हे, नैसर्गिक मृत्यू

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील पीर मोहम्मद पहाडिया परिसरात एका ते दीड वर्षांच्या बालिकेच्या शरीराचे अवशेष सापडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. मात्र तपासानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा मोठा खुलासा केला आहे. ही घटना घातपाताची नसून, संबंधित मुलीचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचं प्राथमिक निष्पन्न झालं आहे.

प्राप्त माहितीनुसार, एका ते दीड वर्षांच्या बालिकेचा कंबरेखालचा भाग आणि एक पाय या स्वरूपात अवशेष सापडल्याची माहिती स्थानिकांना मिळाल्यानंतर पोलिस, फॉरेन्सिक टीम आणि डॉग स्क्वॉड घटनास्थळी दाखल झाले. सुरुवातीला ही घटना संशयास्पद असल्याचं मानलं जात होतं.

मात्र पोलिसांच्या तपासात हे समोर आलं की, परिसरात राहणाऱ्या एका भटक्या जमातीच्या कुटुंबातील ही मुलगी काही दिवसांपासून आजारी होती. तिचा नैसर्गिक मृत्यू झाल्यानंतर पालकांनी तिला गावाजवळच पुरलं होतं. परंतु एखाद्या जनावराने तो खड्डा उकरून प्रेत बाहेर काढल्याने हे अवशेष बाहेर आल्याचं स्पष्ट झालं आहे.

ठाणेदार व्यंकटेश आलेवार यांनी सांगितले की, ''सुरुवातीला घातपाताचा संशय होता. पण तपासानंतर स्पष्ट झालं की मुलीचा नैसर्गिक मृत्यू झाला होता. जनावराने प्रेत बाहेर काढल्याने अवशेष सापडले. घटनेत कोणताही संशयास्पद प्रकार आढळलेला नाही.''

या प्रकरणी मेहकर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.